# अहवाल : माजी विद्यार्थी मेळावा

विभागातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवार दि. २४ मार्च २०१८ रोजी घेण्याचे निश्चित झाल्यानंतर याविषयीची माहिती सोशल मिडियाद्वारे विविध विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्यात आली. शिवाय विविध माजी विद्यार्थ्यांना फोन व एस.एम.एस.द्वारे संपर्क करण्यात आला आणि सदरील कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले. या मेळाव्याकरिता प्रमुख मार्गदर्शक म्हणून विभागाचे सन्माननीय माजी विद्यार्थी तथा ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा.रं.बोराडे उपस्थित होते. तर जळगाव विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक तथा समीक्षक व विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. केशव तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम दोन सत्रात घेण्यात आला. पहिल्या सत्राचे स्वरूप उद्घाटन व प्रमुख पाहुण्यांचे विशेष व्याख्यान असे होते. तर दुसऱ्या सत्राचे स्वरूप सन्माननीय माजी विद्यार्थ्यांकडून विविध सूचना व शिफारशी असे ठेवण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात विभागप्रमुख प्रा.अशोक देशमाने यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ व विशेष व्याख्यान संपन्न झाले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे म्हणाले की, मराठी विभागाने अनेक साहित्यिक कलावंत व समीक्षक घडवण्याचे कार्य केले. अनेकांच्या जीवनाला जसा आकार दिला, तसाच माझ्या अस्तित्वालाही अर्थ दिला. तर समीक्षक डॉ.केशव तुपे म्हणाले, सध्याचा काळ हा मार्केटिंगचा आहे, मार्केटमध्ये काय चालू आहे, याचा विचार करून आपण त्याप्रकारचे अभ्यासक्रम राबविले पाहिजेत. समाजाच्या भौतिक गरजेमुळे भाषा व साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन दुय्यम बनत चालला आहे. आपण भौतिक समृद्धतेला महत्त्व देत असल्याने सांस्कृतिक प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे. यानंतर अध्यक्षीय समारोप करताना प्रा.देशमाने म्हणाले की, मराठी विभागाचे कार्य आणि परंपरा महान आहे. या विभागाने देशभर अनेक आदर्श घालून दिलेले आहे. त्यानुसार आम्ही वाटचाल करण्याचा प्रयत्न करत आहोत. याप्रसंगी मंचावर मेळाव्याचे समन्वय डॉ.कैलास अंभुरे यांची उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाला विभागातील प्रा.दासू वैद्य, प्रा.मीरा घांडगे यांच्यासह माजी विद्यार्थी व अनेक प्राध्यापक उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात विविध माजी विद्यार्थ्यांनी विभाग, विद्यार्थी व अभ्यासक्रमाच्या विकासाच्या संदर्भात काही सूचना केल्या. यामध्ये सध्या प्राध्यापक म्हणून कार्यरत असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या.

1. **डॉ.संजय मून** : मराठी भाषेला उपयोजित करणे गरजेचे आहे. तसेच अभ्यासक्रम हा सौंदर्यवादाकडून वास्जववादाकडे जाणारा असावा.
2. **डॉ.रामचंद्र काळुंखे** : अभ्यासक्रम विद्यार्थीकेंद्री असावा. विद्यार्थ्यांनी फेसबुक, व्हाटस् ॲप सारख्या सोशल मिडियावरील भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ग्रंथव्यवहार या विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करावा. सूत्रसंचालन, व्यवस्थापनाचे ज्ञान देणारा असावा.
3. **डॉ.राम रौनेकर** : उत्तम माणूस निर्माण होईल असा अभ्यासक्रम असावा.
4. **डॉ.कैलास इंगळे** : व्यावसायिक हेतू डोळ्यासमोर ठेवून अभ्यासक्रम ठरवावा.
5. **डॉ.सुरेश पैठणकर** : भाषा प्रभुत्वाच्या आधारे व्यवसायनिर्मिती होईल असा अभ्यासक्रम असावा.
6. **डॉ.पंडित रानमाळ** : मराठी ही ज्ञानभाषा होईल असा अभ्यासक्रम असावा.
7. **डॉ.रामकिसन दहिफळे** : विद्यार्थी तासिकांना बसतील, त्यांना विषयाची गोडी लागेल असा अभ्यासक्रम असावा.
8. **डॉ.ऋषीकेश कांबळे** : अभूयासक्रम ठरल्यानंतर त्याला अंतिम मान्यता मिळण्यापूर्वी त्यावर उघड चर्चा व्हावी. अनुवाद विज्ञान हा विषय एम.ए.च्या अभ्यासक्रमात असावा. माजी विद्यार्थ्यांचे स्वतंत्र संघटन करावे. जाहिरात-प्रसारमाध्यमांचे ज्ञान विद्यार्थ्यांप्रत पोहोचावे. तसेच विभागात होणाऱ्या प्रत्येक लेखन कार्यशाळेस डॉ.कांबळे यांनी 5000 रू. मदत देण्याचे जाहीर केले.

यानंतर माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करण्यात आली.

<u>माजी विद्यार्थी संघटना</u>

अध्यक्ष : डॉ. ऋषीकेश कांबळे

सचिव : डॉ. अनिरूद्ध मोरे

**उपाध्यक्ष** : डॉ. सुरेश पैठणकर

**सदस्य सचिव** : प्रा. अशोक देशमाने

**कार्यकारिणी सदस्य** : डॉ.के.जी. सोनकांबळे, डॉ.संजय मून, डॉ.राम रौनेकर, डॉ.पंडित रानमाळ, प्रा.शिवाजी हुसे, डॉ.सत्त्वशीला जाधव, डॉ.युवराज धबडगे, समाधान दहिवाळ व शरद बोराडे उर्वरित सर्व माजी विद्यार्थी हे संघटनेचे सदस्य असतील आणि मराठी विभागाचे प्रमुख पदसिद्ध सदस्य सचिव असतील असेही ठरविण्यात आले.